# जिल्हा परिषद, गोंदिया
सामान्य प्रशासन विभाग
जि.प. प्रशासकीय इमारत, आमगाव रोड, फुलचूर , गोंदिया
E-mail ID :- dyceogenzpgondia@rediffmail.com, दुरध्वनी क्र.०७१८२-२३६१५५


क्रमांक/जिपगो/साप्रवि/वस/पदभरती/ ४१५/२०२४ दिनांक १४ / २ / २०२४

**जि.प.सरळसेवा पदभरती २०२३ :-**

प्रति,

श्री./ श्रीमती / कु. --------------------------------

--------------------------------------------------

--------------------------------------------------

विषय:- **जिल्हा परिषद गोंदिया सरळसेवा पदभरती २०२३** मुळ दस्तऐवज पडताळणी करिता **दिनांक २६.०२.२०२४** रोजी **सकाळी ११.००** वाजता उपस्थित राहणेबाबत.

**संदर्भ :-** १. जिल्हा परिषद गोंदिया सरळसेवा पदभरती जाहीरात क्र.०१/२०२३ दिनांक ०५.०८.२०२३

२. या कार्यालयाकडुन जाहीर करण्यात आलेला निकाल दिनांक १९.०१.२०२४ व दिनांक १२.०२.२०२४

३. मा. अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे कडुन मान्य टिप्पणी दिनांक १४/०२/२०२४.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, जिल्हा परिषद, गोंदिया सरळसेवा पदभरती २०२३ अंतर्गत घेण्यात आलेल्या वरिष्ठ सहाय्यक (लेखा) / विस्तार अधिकारी (सांख्यीकी) / आरोग्य पर्यवेक्षक या पदाची गुणवत्ता यादी दिनांक १९.०१.२०२४ रोजी व लघु लेखक (निम्न श्रेणी) व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदाची गुणवत्ता यादी दिनांक १२.०२.२०२४ रोजी जिल्हा परिषद गोंदियाचे संकेतस्थळ www.zpgondia.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.०३ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार गुणवत्ता यादीप्रमाणे वरील संवर्गात तात्पुरती निवड केलेल्या उमेदवारांचे मुळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक दस्तऐवज तपासणी **दिनांक २६/०२/२०२४ रोजी सकाळी ११ .०० वाजता** जिल्हा परिषद, गोंदिया येथे करण्यात येणार आहे.

तरी आपण मुळ शैक्षणिक दस्तऐवज व इतर सर्व आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे तसेच जाहीरातीत नमुद अनु.क्र.१९ प्रमाणे आवश्यक दस्तऐवजांच्या मुळ प्रती व ०२ साक्षांकीत प्रती सह **दिनांक २६/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता दस्तऐवज पडताळणी करीता जि.प. प्रशासकीय इमारत, तळ मजला खोली क्र.११, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद गोंदिया, पतंगा मैदान आमगांव रोड, फुलचूर गोंदिया येथे न चुकता उपस्थित रहावे.** वरील प्रमाणे दस्तऐवज पडताळणी दिनांकास गैरहजर राहील्यास गैरहजर राहीलेल्या उमेदवारांना निवड प्रक्रिये संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही. तसेच मुळ दस्तऐवज तपासणीसाठी उपस्थीत राहण्याकरिता कोणताही प्रवाशभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. यांची नोंद घ्यावी.

**( गोविंद खामकर )**
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती, गोंदिया
(जि.प.पदभरती) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(सामान्य)
जिल्हा परिषद, गोंदिया

**प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, गोंदिया तथा जिल्हाधिकारी , गोंदिया.
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया तथा सदस्य जिल्हा निवड समिती, गोंदिया.

## जिल्हा परिषद गोंदिया सरळसेवा पदभरती २०२३
### उमेदवारांनी दस्तऐवज तपासणी करीता घेवुन यावयाच्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | कागदपत्रे/प्रमाणपत्रे |
|---|---|
| १. | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयं घोषणापत्र |
| २. | संकेतस्थळावर ऑनलॉईन पध्दतीने भरलेल्या मुळ अर्जाची प्रिंट केलेली प्रत तसेच परीक्षा फी भरल्याचा पुरावा. |
| ३. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा/ प्रमाणपत्रे |
| ४. | जन्म तारखेचा पुरावा / वयाचा पुरावा. |
| ५. | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र |
| ६. | आर्थीक दृष्टया दुर्बल घटकात येत असल्यास त्याबाबतचा पुरावा प्रमाणपत्र |
| ७. | राखीव प्रवर्गात तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र किंवा जात पडताळणी प्रमाणपत्र |
| ८. | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्ज सादर केलेल्या दिनांकास वैध असणारे) |
| ९. | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र |
| १०. | पात्र माझी सैनिक असल्याचा पुरावा. |
| ११. | खेडाळू आरक्षणानुसार पात्र असल्याचा पुरावा. |
| १२. | अनाथ आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा. |
| १३. | महाराष्ट्र कार्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गावांमधील मराठी भाषीक उमेदवारांना सक्षम प्राधिका-याचा विहीत नमुन्यातील दाखला. |
| १४. | नावात बदल झालेला असल्यास त्याबाबतचा पुरावा. |
| १५. | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा. |
| १६. | लहान कुटूबांचे प्रतिज्ञापत्र अधिनियम २००५ अंतर्गत प्रमाणपत्र |
| १७. | पदविधर/पदविकाधारक अंशकालिन कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र |
| १८ | MSCIT किंवा समकक्ष संगणक परिक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| १९ | टंकलेखन प्रमाणपत्र |
| २० | लघु लेखन प्रमाणपत्र |
| २१ | अनुभव प्रमाणपत्र |
| २२ | ओळखी संबंधी पुरावा. (आधारकार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड, पारपत्र, निवडणूक ओळखपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे खातेपुस्तक ) |

( गोविंद खामकर )
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती, गोंदिया
(जि.प.पदभरती) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(सामान्य)
जिल्हा परिषद, गोंदिया